आरबीआय नं.९३/२००६-०७

डीसीएम (एनई) नं. ७३२/०८.०७.१८/२००२-०३

२८जुलै, २००६

सर्व सरकारी क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील बँका,
विदेशी बँका आणि राज्य सहकारी बँकांचे
चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर

महोदया / महोदय

**मुख्य परिपत्रक - नोटा व नाणी बदलून देण्याची सुविधा**

डीसीएम (एनई) नं. जी-२/०८.०७.१८/२००२-०३ च्या नोटा व नाणी बदलून देण्याच्या सुविधेशी संबंधीत, यापूर्वीच्या मुख्य परिपत्रकातील तरतुदींमध्ये करण्यात आलेल्या बदलांनंतर, पुर्नरचित मुख्य परिपत्रक, माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी आपणाकडे निर्गमित करण्यात येत आहे.

आपला विश्वासु

(यु. एस. पालीवाल)
मुख्य महाव्यवस्थापक

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) नियम- पूर्ण अधिकारांचे प्रदान**

फाटक्या नोटांची सुधारित व्याख्या

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्ट १९३४ च्या सेक्शन ५८(२) सेक्शन २८ नुसार कोणासही किंवा कोणत्याही व्यक्तीस, हरविलेल्या, फाटलेल्या, नष्ट केलेल्या अथवा अप्रमाणित भारतीय चलन अथवा बँक नोट, भारत सरकार अथवा रिझर्व्ह बँकेकडून बदलून मागता येणार नाही. परंतू सत्य प्रकरणात, सर्वसामान्यांना होणारा त्रास कमी करण्याच्या दृष्टीकोनातून, परिस्थितीचा विचार करुन तसेच मर्यादा विचारात घेऊन, केंद्र सरकारच्या
पूर्व संमतीने आरबीआय अशा चलनी नोटांचा किंवा बँक नोटांचा परतावा विशेष प्रकरण म्हणून देऊ शकेल.
या तरतुदीअंतर्गत, सर्वसामान्यांना सुविधा म्हणून सर्व चलन पुरवठा शाखांकडे (करन्सी चेस्ट ब्रॅन्च) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) नियमांतर्गत, फाटलेल्या/ घासलेल्या/अप्रमाणित नोटा बदलून देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

२ नोटा बदलून देण्याची प्रक्रिया जलदगतीने होण्यासाठी पुरवठा (चेस्ट बँक) बँकांच्या शाखांव्यतिरिक्त अन्य बँकांच्या शाखांनीही, पुढे निर्देशित केलेल्या खराब व फाटलेल्या नोट, ग्राहकांना सहजतेने बदलून देण्याच्या आहेत. या नोटा सरकारी भरणा किंवा खातेदारांच्या खात्यातील भरणा म्हणूनही स्वीकारण्याच्या आहेत.

**खराब नोट**

**१ एक रुपया, दोन रुपये व पाच रुपये एकेरी क्रमांकांच्या नोटा;**

सदर नोट ही दोनपेक्षा जास्त तुकड्यांमध्ये नसावी. दोनपैकी एका तुकड्यावर संपूर्ण क्रमांक दिसणे आवश्यक, शिवाय नोटेच्या अत्यावश्यक खुणा सापडणे आवश्यक.

**२ दोन क्रमांक असलेल्या नोटा : दहा रुपये, वीस रुपये, पन्नास रुपये, १०० रुपये, ५०० रुपये व १००० रुपये किमतीच्या नोटा.**

सादर करण्यात आलेली नोट ही दोनपेक्षा जास्त तुकड्यांमध्ये नसावी. अत्यावश्यक खुणा सापडणे आवश्यक. दोन्ही तुकड्यांवरील क्रमांक पूर्णतः जुळणे आवश्यक.

उपरोल्लेखित नोटा या खराब नोट म्हणून ओळखण्यात याव्यात. व खराब नोटांबरोबर ठेवण्यात याव्यात. या अपात्र नोटा चलनात वापरासाठी घेऊ नयेत व बदलण्याकरीता आरबीआय ऑफिसकडे पाठविण्यासाठी, चलन पुरवठा शाखेकडे (करन्सी चेस्ट ब्रॅन्च) भरण्यात याव्यात.

अत्यंत जीर्ण, फारच जळालेल्या राख झालेल्या, घट्ट चिकटलेल्या अशा नोटा

अत्यंत जीर्ण, फारच जळालेल्या राख झालेल्या, घट्ट चिकटलेल्या अशा नोटा, की ज्या सामान्यपणे हाताळता येणार नाहीत, या नोटा बदलून देता येणार नाहीत. अशा नोटा धारण करणाऱ्यांना, संबंधित इश्यु ऑफिसकडे सदर नोटा जमा करण्यास सांगावे. वेगळ्या प्रक्रियेने त्यांची अडचण सोडविण्यात येईल.

पे/पेड/ (किंवा रिजेक्ट) चा शिक्का मारलेल्या नोटा

३ आरबीआय (नोट रिफंड) नियम १९७५ (१९८० पर्यंत केलेल्या दुरुस्त्यांप्रमाणे) प्रत्येक बँक शाखेचा शाख प्रबंधक, अकाउंटंट, रोखापाल हे जीर्ण नोटा बदली प्रक्रियेचे त्या त्या शाखेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून काम पाहतील. खराब नोटांच्या पडताळणीनंतर, सदर नोटेवर प्राधिकृत अधिकारी, तारखेसह, पे/पेड/ (किंवा रिजेक्ट) चा शिक्का मारुन त्यावर आपली अद्याक्षरे लिहितील. पे व रिजेक्टच्या शिक्क्यांवर बँकेचे, शाखेचे नाव असणे बंधनकारक आहे. आरबीआयच्या इश्यु शाखेचा, किंवा कोणत्याही बँकेच्या शाखेचा पे/पेड (किंवा रिजेक्ट) चा शिक्का असलेल्या सदोष नोटा जर निर्देशित बँकांच्या शाखांमध्ये सादर करण्यात आल्या तर, त्या आरबीआय (नोट रिफंड) नियम ५(१) प्रमाणे स्वीकारण्यात येऊ नयेत. त्याचबरोबर नोट सादर करणाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात यावे की, ज्याअर्थी सदर नोटेवर पे/पेड चा शिक्का मारण्यात आलेला आहे त्याअ

र्थी, सदर नोटेची भरपाई करण्यात आली आहे. चुकुनहि पे/पेड शिक्का असलेल्या नोटा नागरिकांना वितरित न करण्याच्या सुचना सर्व बँक शाखांना देण्यात आलेल्या आहेत.

शाखांनीहि आपल्या ग्राहकांना, कोणत्याही बँकेकडून किंवा कोणाकडूनहि अशा नोटा न स्वीकारण्याविषयी सावध करावे.

घोषणा किंवा राजकीय स्वरुपाचा संदेश लिहिलेल्या नोटा

४ आर बी आय (नोट रिफंड) नियम ५(२) प्रमाणे घोषणा किंवा राजकीय स्वरुपाचा संदेश लिहिला असल्यास नोटेचे कायदेशीर अस्तित्व नष्ट होते. अशा नोटेच्या बदलीची मागणी फेटाळण्यात येते. त्याचप्रमाणे अप्रमाणित नोटांची बदलीची मागणीही उपरोल्लेखित आर बी आय (नोट रिफंड) नियम ५(२) प्रमाणे फेटाळण्यात येते.

जाणीवपूर्वक फाडलेल्या नोटा

५ आर बी आय (नोट रिफंड) नियम ५(२) (!!) प्रमाणे, जाणीवपूर्वक कापलेल्या किंवा हाताळलेल्या नोटा बदलण्यासाठी सादर केल्यास त्या फेटाळण्यात याव्यात. जाणीवपूर्वक नोट खराब केली आहे काय हे, अचुकपणे ठरविणे जरी अवघड असले तरी, बारकाईने तपासल्यास, नोटेची खराबी करण्यामागे घोटाळ्याचा उद्देश आहे काय हे उघड होऊ शकेल. खास करुन मोठ्या प्रमाणात अशा नोटा सादर करण्यात आल्या असल्यास, नोटेचा आकार, विशिष्ट नसलेला भाग, यामध्ये मोठे साधर्म्य आढळून येते. अशा प्रकरणात, नोटा सादर करणाऱ्याचे नाव, नोटांचे क्रमांक, त्यांचे दर्शनी मुल्य आदी तपशील संबंधित बँक ज्या इश्यु डिपार्टमेंटच्या कायक्षेत्रात येते त्या डिपार्टमेंटच्या डेप्युटी/जनरल मॅनेजर यांना सादर करण्यात यावा. जाणीवपूर्वक मोठ्या प्रमाणात नोटा खराब केल्या असल्यास, स्थानिक पोलिसांना खबर करण्यात यावी. खराब नोटांच्या संदर्भात खाजगी चलन बदली करणारे/ व्यावसाईक, बदली सुविधेचा गैरफायदा घेत नाहीत याची शाखांनी खात्री करुन घ्यावी.

प्रशिक्षणाचे कार्यक्रम

६ चलन पुरवठा शाखांच्या (करन्सी चेस्ट ब्रॅन्च) प्रिस्क्राईब्ड ऑफिसर्स (प्राधिकृत अधिकारी) यांना प्राथमिकतेच्या तत्वावर प्रशिक्षणाचे कार्यक्रम घेण्याच्या आमच्या इश्यु ऑफिसेसना सुचना देण्यात आलेल्या आहेत. बँकांनीही प्राधिकृत अधिकारी म्हणून काम पाहणारेच प्रशिक्षणासाठी पाठविण्याकडे लक्ष पुरवावे. प्रशिक्षणामध्ये खराब नोटांची आत्मविश्वासाने पडताळणी करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कायदेशीर प्रक्रियेची माहिती देण्यात येत असल्याने, प्राधिकृत अधिकारी म्हणून काम करणाऱ्यांनी हे प्रशिक्षण पूर्ण करणे गरजेचे आहे.

दर्शनी ठिकाणी बोर्ड लावणे

७ सर्व नामनिर्देशित बँक शाखांनी आपल्या शाख्ेत 'खराब नोटा स्वीकारल्या जातील व बदलून मिळतील' असा दर्शनी ठिकाणी बोर्ड लावणे गरजेचे आहे. बँकांनी आपल्या नामनिर्देशित शाखांमध्ये नोटा बदलून देण्याची सुविधा कार्यरत आहे असे पहावे.

एक हजार रुपयांची नोट

८ एक हजार रुपयांची नोट अस्तित्वात आल्यापासून, नोट रिफंड नियमांमध्ये ज्या ज्या ठिकाणी पाचशे रुपये असा उल्लेख आला आहे. त्या त्या ठिकाणी एक हजार रुपये असा बदल करण्यात आला आहे. व १००० हा आकडा ५०० या आकड्याच्यापुढे जोडण्यात आला आहे. या बदलामागे कारण हे आहे की, डबल नंबरच्या नोटांच्या

बदलीसंबंधीचे नियम जे ५०० रुपयांपर्यंतच्या नोटांना लागू होते ते आता, १००० रुपयांच्या नोटांच्या बदलण्याला लागू झाले आहेत.

अशा प्रकारे, दहा रुपये, वीस रुपये, पन्नास रुपये, शंभर रुपये व पाचशे रुपयांच्या नोटांच्या पडताळणीसाठी लागू असलेले आरबीआय (नोट रिफंड) नियम हे आता एक हजार रुपये दर्शनी मुल्याच्या नोटेसही लागू झाले आहेत.

करन्सी चेस्टमध्ये पडताळणी झालेल्या नोटा निरास्त करताना

९ करन्सी चेस्टमध्ये, इश्यु ऑफिसच्या अधिकाराखाली पडताळणी झालेल्या नोटांचे ऑडिट करताना, पूर्ण मुल्य परतावा झालेल्या चलनी नोटा, चलन पुरवठा शाखांनी (करन्सी चेस्ट ब्रॅन्चेस) --- इश्यु ऑफिसकडे जमा पुढिल खराब नोटांच्या रेमिटंस बरोबर इश्यु ऑफिसकडे जमा कराव्यात, चलन पुरवठा शाखेकडे (करन्सी चेस्ट ब्रॅन्च) जमा झालेल्या, अर्धमुल्य परताव्याच्या व नाकारलेल्या नोटा, जमा रोकडबरोबर ठेवलेल्या असल्यास, पूर्ण परताव्याच्या नोटांच्या बंडलप्रमाणेच वेगळे बंडल बांधून दोन्ही एकत्र सादर करता येतील किंवा, वीमा उतविलेल्या रजिस्टरने आवश्यक त्याप्रमाणे पाठवून देता येतील. पूर्ण परताव्याच्या नोटांची, चलन भरपाई म्हणून नेहमीप्रमाणे नोटांच्या इनव्हॉईस अकाउंटमध्ये मोजदाद करण्यात येईल तर, अर्ध परताव्याच्या किंवा नाकारलेल्या नोटांची दावा विभागात नोंद करुन वेगळी हाताळणी करण्यात येईल.

बँक शाखांमध्ये चलन बदलून मिळण्याची सुविधा

१० देशातील चलन पुरवठा नियंत्रण बँकांच्या सर्व शाखांनी, पुढील सेवा नागरिकांना पुरविण्याकामी तत्पर व कटिबद्ध राहिले पाहिजे. जेणेकरुन या कारणासाठी, नागरिकांना थेट रिझर्व्ह बँकेच्या विभागीय कार्यालयांकडे जाण्याची गरज राहणार नाही.
(ए) चांगल्या दर्जाच्या नोटा व नाण्यांचा मागणीप्रमाणे पुरवठा करणे (बी) खराब नोटा बदलून देणे (सी) व्यवहारांसाठी किंवा बदलून देण्यासाठी नाणी व नोटा स्वीकारणे.
सर्व बँकांच्या चलन पुरवठा शाखांनी खराब किंवा वापरण्यास निरुपयोगी नोटा बदलून देण्याची सुविधा उपलब्ध करुन घ्यायची आहे. निरुपयोगी नोटांसदर्भात आरबीआय(नोट रिफंड) नियम १९७५ (१९८०पर्यंतच्या दुरुस्त्यांसह) मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्याची आहे. सदर नियम व तरतुदी आरबीआयच्या वेबसाइटवर प्रदर्शित करण्यात आलेले आहेत.

आपल्या बँकेच्या शाखांमध्ये सदर सुविधा उपलब्ध आहेत याची माहीती नागरिकांना मिळेल अशी तपशीलवार प्रसिद्धीची योजना करावी.

११(ए) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व कमर्शियल बँकांदरम्यांनच्या करारानुसार चलन पुरवठा केंद्र (करन्सी चेस्ट) किंवा/व छोटा नाण्यांचा विभाग स्थापन करुन सदर बँकांनी आपल्या शाखा नोटांच्या बदल्यात नाणी स्वीकारतील असे पहावे. आपल्या शाखांना पुढील सुचना देण्याविषयी सदर बँकांना सांगण्यात आले आहे.

(१) नागरिकांकडून देण्यात येणारी कोणत्याही दर्शनीमुल्यांची नाणी, विनाअट स्वीकारणे व त्या रकमेच्या नोटा देणे बंधनकारक आहे.

(२) या कामासाठी आवश्यकतेप्रमाणे, मोजणी यंत्रे वापरता येतील, किंवा मोठा प्रमाणात नाणी असल्यास वजनावर घेता येतील.

(३) स्वीकारलेल्या नाण्यांमधील रुपयांची नाणी ही रोकड उपयोगिता (चेस्ट बॅलन्स) म्हणून तर, लहान नाणी, छोटा नाण्यांच्या विभागाकडे वर्ग करावित.

(४) छोटा नाण्यांच्या विभागाकडे जमा होणारी, पाच, दहा व वीस पैसे दर्शनी मुल्याची नाणी, विद्यमान प्रक्रियेप्रमाणे, वेळोवेळी हैद्राबाद, कोलकाता, मुंबई येथील भारत सरकारच्या टांकसाळीकडे पाठविता येतील.

(बी) काऊंटरवर, भरण्यासाठी अगर बदली करुन घेण्यासाठी अशा कोणत्याही कारणासाठी येणारी नाणी स्वीकारण्याच्या सुचना बँकांनी आपल्या शाखांना देण्याच्या आहेत. कमी दर्शनी मुल्याची नाणी ही वजनावर स्वीकारणे सोईचे होऊ शकेल मात्र, प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये शंभरच्या संख्येत पॅक केलेली नाणीही रोखापाल व ग्राहक या दोघांनाही हाताळणे जास्त सोयीचे होणार आहे. बँकांनी अशा प्लॅस्टिकच्या पिशव्या, ग्राहकांसाठी काऊंटरवर उपलब्ध करुन द्याव्यात. तशा आशयाची सुचना बँकेच्या आवारात दिसेल अशा स्वरुपात लावता येईल. पाच, दहा व वीस पैशांची अल्युमिनियमची नाणी, अल्युमिनियम ब्रान्झची व स्टेनलेस स्टीलची दहा पैशांची नाणी, कॉपर निकेलची पंचवीस आणि पन्नास पैशांची नाणी आणि एक रुपयांची नाणी हि चलनातून काढून टाकण्यात आली असून ती टांकसाठीकडे पाठविण्याची आहेत हे लक्षात घेऊन ग्राहकांना विनंती करण्यात यावी की, नागरिकांनी सदर नाणी वेगवेगळ्या प्लॅस्टीकच्या पिशव्यांमध्ये, शक्यतो शंभरच्या संख्येत जमा करावी. सदर सुचना ही विनंतीवजा असावी, तो आदेश नसावा. अशाच प्रकारची व्यवस्था वापरातील स्टेनलेस स्टीलच्या पंचवीस, पन्नास आणि एक रुपयाच्या नाण्यांसाठी, कॉपर निकेलच्या दोन रुपये व पाच रुपयांच्या नाण्यांसाठी करता येईल. नाण्यांच्या वजनांतील तफावतीमुळे काऊंटिंग मशीनचा या कामासाठी वापर होऊ शकेल. बँकेच्या शाखांमध्ये नाणी साठविण्यात येणारी अडचण लक्षात घेऊन पाच, दहा व वीस पैशांची अल्युमिनियम नाणी, अल्युमिनियम ब्रॉन्झची व स्टेनलेस स्टीलची दहा पैशांची नाणी, कॉपर निकेलची पंचवीस, पन्नास पैशांची, आणि एक रुपयाची नाणी; मुंबई / कोलकाता / हैद्राबादयेथील शासकीय टांकसाळीकडे पाठविण्यासाठी, त्यांच्याकडे पूर्वसुचना देऊन तिजोरीमधून पाठवून देण्याची प्रचलित पद्धत वापरावी. स्टेनलेस स्टीलची पंचवीस, पन्नास आणि एक रुपयाची, कॉपर निकेलची दोन रुपये व पाच रुपयाची नाणी पुन्हा चलनात आणावीत. मागणी नसल्यामुळे, अशी नाणी तिजोरीच्या साठवण क्षमतेपेक्षा जास्त जमल्यास, क्षेत्रीय कार्यालयात नाणी पुरविणाऱ्या विभागाकडे, सदर नाणी चलनात बदलून मिळण्याची मागणी करता येईल. या संदर्भात, शाखांकडून पूर्तता होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी, विभागीय आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना अचानक भेटी देण्यास व मुख्य कार्यालयाकडे अहवाल सादर करण्यास सांगण्यात यावे. मुख्य कार्यालयामध्ये, सदर अहवालाचे निरिक्षण करुन त्यावर आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. यासंदर्भातील कसलीही अपूर्तता हि रिझर्व्ह बँकेच्या आदेशाचा भंग म्हणून पाहण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कृपया आमच्या विभागीय कार्यालयाकडे पोहोच कळवावी.

पुरवणी

मुख्य परिपत्रक

विषयः रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) नियम - अधिकार प्रदान

| परिपत्रक क्र. | दिनांक | माहिती |
|---|---|---|
| जी-६७/०८.०७. १८/ ९६-९७ | १८.०२.१९९७ | आरबीआय (नोट रिफंड) नियम, १९७५, करन्सी चेस्ट ठेवणाऱ्या खाजगी क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकारांचे प्रदान |
| जी-५२/०८.०७.१८/ ९६-९७ | ११.१.१९९७ | आरबीआय (एनआर) नियम. सरकारी क्षेत्रातील बँकांना अपात्र नोटांसंबंधी पे/पेड स्टॅम्प मारुन - रद्द करण्याचे निर्णय घे्ण्याचे पूर्ण अधिकार देणारी योजना. |
| जी-२४/०८.०१/ ९६-९७ | ०३.१२.१९९६ | फाटलेल्या नोटा स्वीकारून बदलून देण्याची सुट |
| जी-६४/०८.०७.१८/ ९५-९६ | १८.५.१९९६ | आरबीआय (एनआर) नियम सरकारी क्षेत्रातील बँकांच्या चलन पुरवठा शाखांना खराब नोटा बदलण्याचे अधिकार. |
| जी-७१/०८.०७.१८/ ९२-९३ | २२.६.१९९३ | आरबीआय (एनआर) नियम सरकारी क्षेत्रातील बॅंकांच्या शाखांना अपात्र नोटा बदलून देण्याच्या पूर्ण अधिकारांची प्रसिद्धी |
| जी-८३/सीएल-१ (पीएसबी)- ९१-९२ | ०६.५.१९९२ | आरबीआय (एनआर) नियम सरकारी क्षेत्रातील बँकांच्या चलन शाखांना अपात्र नोटा बदलून देण्याबाबतचे अधिकार |
| जी-७४/सीएल- (पीएसबी) (जनरल) ९०-९१ | ०५.६.१९९१ | आरबीआय (एनआर) नियम- या अंतर्गत सरकारी क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकार |
| ५.५/सीएल- १ (पीएसबी) - | २५.९.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - सरकारी क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची |

| | | |
|---|---|---|
| ९०/९१ | | योजना. |
| ८/सीएल - १ (पीएसबी) - / ९०/९१ | १७.८.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - सरकारी क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची योजना. |
| जी- १२३/सीएल-१ (पीएसबी) (जनरल)- ८९/९० | ०७.५.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - सरकारी क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची योजना. (दुरुस्ती) |
| जी-१०८/सीएल-१ (पीएसबी) (जनरल) - ८९/९० | .३.४.१९९० | आरबीआय (एनआर) नियम - १९८९ सरकारी क्षेत्रातील बँकांच्या शाखांमध्ये अपात्र नोटा बदलून देणे. ५०० रुपयांच्या बँक नोटस्. |
| जी- ८/सीएल- १ (पीएसबी)- ८९/९० | १२.७.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - आरबीआय इश्यु ऑफिसच्या 'टु क्लेम' शिक्का असलेल्या अपात्र नोटांसंबंधी. |
| जी.८४/सीएल.१ (पीएसबी)- ८८/८९ | १७.३.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - सरकारी क्षेत्रातील बँकांना नोटा बदलून देण्याचे पूर्ण अधिकार. |
| जी.६६/सीएल.१ (पीएसबी)- ८८/८९ | ०९.२.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - सरकारी क्षेत्रातील बँकांच्या पूर्ण अधिकारांबाबत प्रशिक्षण. |
| एस.१२/सीएल.१ (पीएसबी)- ८८/८९ | ३०.९.१९८९ | आरबीआय (एनआर) नियम - जाणीवपूर्वक खराब केलेल्या नोटांसंबंधी प्रक्रिया. |
| जी.१३४/सीएल/१ (पीएसबी)- ८७/८८ | २५.५.१९८८ | आरबीआय (एनआर) नियमांतर्गत पूर्ण अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी योजना राबविणेबाबत. |
| १९२/सीएल - १- (पीएसबी)- ८६/८७ | ०२.६.१९८७ | आरबीआय (एनआर) नियम - सरकारी क्षेत्रातील बँकांना अधिकार देण्याबाबतची योजना. |
| १८९/सीएल.२/८६/८७ | ०२.६.१९८७ | चलनी नोटांवर लिहून किंवा संदेश, घोषणा लिहून त्यांचे अवमुल्यन करणे. |
| १८५/सीएल - १ (पीएसबी) ८६/८७ | २०.५.१९८७ | आरबीआय (एनआर) नियम - खराब नोटांवर 'पे' किंवा ' रिजेक्ट' चा शिक्का मारणे बाबत. |
| १७३/सीएल. १ ८५/८६ | ०२.४.१९८५ | खराब नोटा बदलून देण्याचे/त्याची प्रक्रिया या संदर्भात सरकारी क्षेत्रातील बँकांना पूर्ण अधिकार प्रदान. |
| सीवाय नं. १०६४/सीएल. १/ | ०९.८.१९७६ | खराब नोटा व थोड्या हाताळल्या गेलेल्या नोटा बदलून मिळण्याची |

| | | |
|---|---|---|
| ७६/७७ | | नागरिकांना सुविधा. |
| सीवाय नं. ३८६/०८.०७.१३/ २०००-२००१ | १६.११.२००० | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) नियम- सरकारी व खाजगी क्षेत्रातील करन्सी चेस्ट बँकांच्या शाखांना, नोटा बदलून देण्याचे पूर्ण अधिकार. |
| जी- ११/०८.०७.१८/ २००१-०२ | ०२.११.२००१ | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नोट रिफंड) नियम, १९७५- अन्वये सरकारी व खाजगी क्षेत्रातील करन्सी चेस्ट बँकांच्या शाखांना, नोटा बदलून देण्याचे अधिकार. |
| डीसीएम (आरएमएमटी) क्र. ४०४/११.३७.०१/ २००३-०४ | ०९.१०.२००३ | नाणी स्वीकारणे व नोटा उपलब्ध करुन देणे. |
| डीसीएम (एनई) क्र. ३१०/०८.०७.१८/ २००३-०४ | १९.०१.२००४ | नोटा, नाणी आदी बदलून मिळण्याची सुविधा नागरिकांना पुरविणे. |
| डीसीएम (आरएमएमटी) क्र. ११८१ / ११.३७.०१ / २००३-०४ | ०५.०४.२००४ | नाणी स्वीकारणेबाबत. |